क :

जा.क्र.कोजिप/आरोग्य/आस्था/कावि-५/ /२०२५
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर
दिनांक :- /०१/२०२५

वाचले
१) सा.प्र.वि.अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.२८१/बारा दि.२१ जून २०२१
२) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.२८१ /कार्या-१२, दि.१३ जुलै २०२१
३) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभागाकडील पत्र क्र. संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५०९/आस्था-७ दि.२९ नोव्हेंबर २०२४
४) मा. मु. का. अ., जि. प. कोल्हापूर यांचेकडील प्रदान अधिकार प्रदान आदेश क्र.कोजिप/साप्रवि /कावि-१/१८६८ /२०११, दिनांक १६/०९/२०११ मधील क्रमांक ८१
५) कार्यालयीन मंजूर टिपणी दि. /०१/२०२५.

**आदेश**

संदर्भ क्र. १ ची अधिसूचना व संदर्भ क्र. २ परिपत्रकान्वये तात्पुरती जेष्ठता यादी प्रसिध्द करताना संदर्भ क्र.१ मधील परिशिष्ट चार मधील सूचनांनुसार १ जानेवारी २०२४ जे ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत थेट नियुक्तीने व नियमित/तात्पुरत्या पदोन्नतीने नियुक्ती झालेल्या कर्मचा-यांची तात्पुरती जेष्ठतासूची प्रसिध्द करणेबाबत कळविले आहे. तसेच संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये संदर्भ क्र.१ ची अधिसूचना जिल्हा परिषद कर्मचा-यांना लागू करणेत आलेली आहे. त्यास अनुसरुन आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूरकडील जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग-३ **आरोग्य सेवक (पुरूष)** या पदावर काम करणाऱ्या सेवकांची दि.०१/०१/२०२४ ते दि.३१/१२/२०२४ अखेर केवळ त्या संबंधित वर्षात नियमित पदोन्नती, सरळसेवा वा अन्य विहित मार्गाने नियुक्ती झालेल्या कर्मचा-यांची दिनांक ०१/०१/२०२५ ची तात्पुरती अतिरिक्त जेष्टता यादी सोबत दर्शविल्याप्रमाणे प्रसिध्द करणेत येत आहे.

पदोन्नतीचे आरक्षण रदद करण्याबाबत मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिका क्र.२७९७/२०१५ वर दि.४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ वरील निर्णय प्रलंबित असून पदोन्नती देण्यासंदर्भात मार्गदर्शनपर सूचना सामान्य प्रशासन विभागाच्या दि.७ मे २०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रसारित केल्या आहेत. त्यानुसार देणेत आलेल्या पदोन्नती हया निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात आहेत. त्यामुळे सदरची तात्पुरती अतिरिक्त जेष्टता यादी ही मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या निर्णयामुळे होणारा बदलांच्या अधिन राहून प्रसिध्द करणेत येत आहे.

सदरची यादी सर्व संबंधितांचे निर्दशनास आणावी व त्याबाबत काही हरकती / दुरुस्ती असल्यास त्या संबंधित कार्यालय प्रमुखांचे मार्फत मुळ सेवानोंद पुस्तकावरुन पडताळणी करुन आवश्यक कागदपत्रासह **दि. / /२०२५** अखेर इकडील कार्यालयाकडे सादर कराव्यात. हरकती / दुरुस्ती या वेळेवर प्राप्त न झालेस त्याबाबत नंतर कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही याची सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना पूर्व सूचना देणेत यावी. जेष्टता यादी निर्दशनास न आणलेबाबतची तक्रार आलेस याबाबत संबंधितांवर प्रशासकीय कार्यवाही करणेत येईल याची नोंद घेणेत यावी. सेवाजेष्टता यादी कर्मचाऱ्यांचे निदर्शनास आणलेबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. जेणेकरुन कोणत्याही कर्मचाऱ्यावर अन्याय होणार नाही याची दक्षता घ्यावी . तसेच सदरची जेष्टता यादी ही जिल्हा परिषदेच्या **zpkolhapur.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करणेत आलेली आहे.

(डॉ.अनिरुध्द पिंपळे)
**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

प्रति,

१) तालुका आरोग्य अधिकारी ....................(सर्व ), जिल्हा परिषद, कोल्हापूर
२) वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र ....................(सर्व ), जिल्हा परिषद, कोल्हापूर